क्र मह/आस्था-२/नात/कावि/ २७० /२०२६
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय, विधान भवन पुणे-१
दिनांक ३०/०७/ २०२६

## अधिसूचना

शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८ दिनांक १४/११/२०१३ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालयासाठी १ विधी अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या मुदतीसाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार किंवा सेवा प्रवेश नियमानुसार नियुक्ती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. तसेच क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१६८/(E-१०२७७५६) ई-८ दिनांक २५/०४/२०२५ अन्वये सदर विधी अधिकारी हे पद एकत्रित मासिक मानधन रक्कम रुपये ४५,०००/- आणि दुरध्वनी व प्रवासखर्च रुपये ५०००/- अशी एकूण रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) ठोक रकमेवर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी भरणेत येणार असून ते शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव**

(१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा आणि तो वकिलीची सनदधारक असावा.
(२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
(३) उमेदवार महसूल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्यांची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असावा ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
(४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.
(५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ पेक्षा जास्त नसावे.

सदर अर्जाचा नमुना, अटी, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या व इतर बाबतची माहिती विभागीय आयुक्त, पुणे विभाग, विधान भवन (महसूल शाखा) पुणे येथे तसेच कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://divcompune.maharashtra.gov.in/ यावर उपलब्ध होऊ शकेल.

**विधी अधिकारी यांची निवड**

विधी अधिकारी यांची निवड, शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेच्या आधारे विना मुलाखत विभागीय आयुक्त,पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अखत्यारीत राहील.तसेच विभागीय आयुक्त, पुणे हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

पात्र असलेल्या उमेदवारांकडून विहीत नमुन्यातील अर्ज दोन प्रतीत मागविणेत येत असून सदर अर्ज विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, (टपाल शाखा) विधान भवन, पुणे ४११ ००१ या कार्यालयात दिनांक ३१ /०८ /२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटीचे दिवस सोडून) प्राप्त होतील अशा बेताने सादर करावेत. त्यानंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

गुणांकाचा तपशिल

| कायद्याचा पदवीधर | मान्यता प्राप्त विद्यापिठातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण | मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान | विधी व्यवसायाचा किमान 7 वर्षाचा अनुभव | संगणक विषयक ज्ञान व AI बाबत ज्ञान | महसूल, फ्रौजदारी अर्धन्यायीक कामकाज बाबत जसे लोकआयुक्त , करमणूककर बाबत आदेश,जमीन , शस्त्र याबाबत अपिल कामकाजविषयक | दिवाणी फ्रौजदारी अपिल कामकाजा बाबत ज्ञान | आस्थापना बाबत ज्ञान व MAT प्रकरणाबाबत ज्ञान | उच्च , सर्वोच्च, हरीत न्यायालयातील कामकाजाबाबत | उच्च , सर्वोच्च , MAT, हरीत न्यायालयात परीच्छेद निहाय अहवाल शपथपत्र इंग्रजीमध्ये सादर करणेबाब्त ज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| गुण -१० | गुण -१० | गुण-१० | गुण -१० | गुण-१० | गुण -१० | गुण- १० | गुण- १० | गुण- १० | गुण- १० |

टिप- वरील अनुक्रमांक ६ ते १० बाबत संबंधित उमेदवार यांनी पुराव्या दाखल म्हणून संबंधित न्यायालयात दाखल केलेले वकीलपत्र, निकालपत्र किंवा इत्यादी अनुषंगिक कागदपत्राच्या साक्षांकित प्रती व अनुक्रमांक १ ते ५ बाबत मान्यताप्राप्त विद्यापिठाचे/संस्थेचे साक्षांकित प्रमाणपत्र सादर करावेत.

30.07.2026
(शीतल तेली-उगले)
विभागीय आयुक्त, पुणे
विभाग पुणे.

प्रत्येक विभागीय आयुक्त कार्यालयासाठी १ याप्रमाणे ६ विधी अधिकारी ही पदे कंत्राटी पध्दतीने निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८
३२ वा मजला, सेंटर-१ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
कुलाबा, मुंबई- ४०० ००५
तारीख: १४ नोव्हेंबर,२०१३.

प्रस्तावना

विभागीय आयुक्त स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणात परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करुन शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी शासकीय वकीलांना सहाय्य करणे इत्यादी कामांकरीता राज्यातील ६ विभागीय आयुक्त कार्यालयात प्रत्येकी १ या प्रमाणे ६ विधी अधिकारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय**

महसूल प्रशासनातील विभागीय आयुक्त स्तरावरील न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू योग्य रित्या मांडण्यासाठी संबंधित महसूल अधिकाऱ्यांना मदत व्हावी तसेच न्यायालयीन प्रकरणांचा योग्य पाठपुरावा ठेऊन त्यांचा जलद निपटारा व्हावा या दृष्टीने राज्यातील प्रत्येक विभागीय आयुक्त कार्यालयासाठी १ याप्रमाणे ६ विधी अधिकारी यांची एकत्रित मानधन रुपये २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त)+ दुरध्वनी व प्रवास खर्च रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या ठोक रक्कमेवर कंत्राटी पध्दतीने पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. उपरोक्त ६ विधी अधिकारी ही पदे नियमित वेतनश्रेणीत न भरता एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. सदरहू विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

ब) सदर नेमणुका करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी

16.11.13
DCR

नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

क) संबंधित नियुक्ती प्राधिकारी शासनाच्या वतीने नियुक्तीचे वेळी संबंधिताबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. कराराचे विहित प्रपत्र परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आले आहे. कराराची सर्व कागपदपत्रे जतन करुन ठेवणे ही त्या संबंधित कार्यालयाची जबाबदारी असेल.

ड) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

इ) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्ये व जबाबदा-या तथा निवडमंडळ यांचा तपशील परिशिष्ट अ मध्ये देण्यात आला आहे. सक्षम प्राधिका-यांनी या शासन निर्णयात करण्यात आलेल्या तरतुदीनुसार तथा शासनाच्या धोरणानुसार उमेदवारांची निवड करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

३. उपरोक्त बाबीवरील खर्च "मागणी क्र. सी-१-२०५३-जिल्हा प्रशासन (००)१०१ आयुक्त या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६७/ २०१३ / व्यय-९, दिनांक १४.१०.२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१११४१६३९१५४५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikrishna Baburao Pawar
Digitally signed by Shrikrishna Baburao Pawar
DN: CN = Shrikrishna Baburao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2013.11.16 11:08:21 +05'30'

(श्रीकृष्ण पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रतिलिपी,

१. मा. राज्यपालाचे प्रधान सचिव

परिशिष्ट "अ"

(महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८. दि. १४ नोव्हेंबर, २०१३.)

कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाच्या **विधी अधिकारी** या पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, कर्तव्य, व जबाबदा-या पुढीलप्रमाणे आहेतः-

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल.

२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

**३) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.**

**४) उमेदवारास मराठी, हिंदी, व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.**

**५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षांपेक्षा जास्त नसेल.**

**विधी अधिकारी यांची निवड :**

विधी अधिकारी यांची निवड विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहिल. तसेच संबंधित विभागीय आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या :**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायलयीन प्रकरणे हाताळणे.

२) महसूल विषयक/ परिच्छेदनिहाय अभिप्राय (parawise comments) तयार करणे/ सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर "नोडल ऑफिसर" म्हणून काम पहाणे.

८) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

*****

परिशिष्ट "ब"

(महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दि. १४ नोव्हेंबर, २०१३.)

## AGREEMENT

This agreement is made at __________ on __________ between the Governor of State of Maharashtra exercising the Executive Powers of the Government of State of Maharashtra thorough Shri.
COMPETENT AUTHORITY, having his office at __________________ hereinafter referred to as "the Government" (which expression shall unless it be repugnant to the context or meaning thereof be deemed to include its successors, agents and permitted assignee) of the first party. AND Shri /Smt. ______________Age_______residing at __________ hereinafter referred to as the second party.

WHEREAS the Government has decided to recruit the post of Law Officer on contract basis. Accordingly, the Government in Revenue Department has issued Government Resolution No. Dtd.

AND WHEREAS the Government had published advertisement in daily News paper on regarding recruitment for the post of

AND WHEREAS in pursuance to the above advertisement, the candidates who applied for the post of Law Officer possessing minimum qualification prescribed for the post of by the Competent Authority and were called for interview for the said post of Law Officer.

AND WHEREAS after holding interview of candidates called for interview for the post of Law Officer, Shri /Smt. ____________________is selected by the selection board constituted by the Government.

AND WHEREAS the Government vide its letter no.
Dtd. __________ has communicated to Shri/Smt. ____________________ Regarding his / her selection as a Law Officer for a period of 11 months on the consolidated salary of Rs. (Rupees.________Only.) and on the terms and conditions as stated herein below.

AND WHEREAS Shri/Smt. ______________________________has vide his Her letter dated accepted the offer regarding appointment as a ____________________ by the competent Authority on contract basis, on the terms and condition prescribed in this agreement Authority on contract basis, on the terms and condition prescribed in this agreement.

AND WHEREAS Shri/Smt. ______________________________has therefore to execute an Agreement.

NOW THIS AGREEMENT WITNESSTH AND IT IS HEREBY AGREED AND DECLARED BY AND BETWEEN THE PARTIES HERETO AS FOLLOWS:-

1. The first party hereby agrees to appoint Shri/Smt. ________________ (Party No. II) as a ________________ on contract basis for a period of 11 months commencing from ____________ to (mention date) or consolidated remuneration of Rs.____________ (Rupees ____________________ only) per month, and said remuneration will be payable at the end of each calendar month according to British calendar. It is agreed that II nd party shall not be entitled for separate T.A. and D.A. During the contract period. However competent Authority may sanction the T.A. Under compelling and exceptional circumstances.

2. The Divisional commissioner and the concerned Competent Authority will have full administrative control over the II nd Party and II nd party is bound to perform duties, as per their General and special instructions. Failure to do so shall be treated as breach and will be liable for termination of this Contract.

3. List of duties for the post of__________ is annexed to his Agreement as schedule-I. It is agreed the duties prescribed in the schedule-I are not exhaustive but are illustrative and II nd party will be bound to perform its duties, as directed by competent authority from time to time. The party No II shall carry out its duties as ____________ and execute orders/instructions issued by the first party with due diligence and efficiency during period of contract.

4. In case of any default on the part of the party No. II if the Government suffers financial loss or damage then the Government will be at liberty to recover the said loss/ damage from party No. II It shall have chargo on the amount of remuneration payable to party no. II.

5. Assignment of 11 months contract is renewable for a further two terms of 11 months (i.e. Total 3 terms), subject to the satisfaction of competent authority. and on its recommendations.

6. The party No. II will not be entitled to claim any rights, interest, benefits whatsoever of the permanent service in The Government.

7. The first party will be at liberty to terminate this agreement without signing any reason before completion of the tenure of 11 months and without giving prior notice in writing.

8. The Party No. II will also be at liberty to terminate this agreement by giving one month prior written notice to the First party.

9. In the event of clause 7 and 8, the first party shall be liable to pay proportionate remuneration to the party No. II till date of termination of the agreement.

10. The party no. II shall hold in confidence and shall not dis-close to any person any information, documents, official secrets from office record assigned to it. The party No. II shall take due care to maintain the confidentiality of such information, documents, offcial secrets. The party No. II shall be fully responsible for any disclosure or misuse of such information, documents and official secrets. The II nd party will have to maintain utmost secrecy and confidentiality at all times as regards any information or knowledge obtained / gathered during the said contractual period, and will not indulge in any activity prejudicial to the interest of the Revenue Department or Government.

11. The normal working hours of ________________ shall be as determined by the concerned competent authority from time to time.

12. If at any time, the Competent Authority is of the opinion that integrity of the second party is doubtful or II nd party behave in a disorderly or in a negligent

manner or violated any term/condition of this contract, then in that event, without giving any notice the contract shall stand terminated.

13. After termination of this agreement the party No.II shall be bound to return all the office record, papers, documents, books or other material in its custody, to the party No. I

14. The party No. II shall not be entitled to any kind of leave and he/she will not leave the Headquarter or duty without prior permission of the competent Authority during the period of contract.

15. Absence of the II nd party at the work for more than 10 days without any sufficient cause, would automatically amount to termination of this contract without any notice or intimation to the II nd party by the competent Aythority. And II nd party shall not be entitled for the remuneration for the said period of absence.

16. In case the party No. II could not attend the work for any reason and remains absent with previous permission of the Competent Authority party no II shall be entitled to proportionate remuneration for the period he actually attended the work.

17. It is agreed that during the aforesaid period of contract II nd Party will not undertake any private work/ profession as legal practitioner, except after taking special permission from the Competent Authority. If the Competent Authority is satisfied that such work affects the performance of duties and the same against interest of State, the competent Authority may refuse permission of such work. Despite such refusal of permission, if II nd party accepts / continue to do the private work. This Agreement/appointment shall stand terminated and if any loss/demage is caused to the Government due to such act of the II nd party, he/she will be liable for action as per Law.

18. The party No. II shall not delegate any of his/her rights and duties and obligation under this agreement to any third person.

In witness whereof. The parties hereto have both caused this agreement to be executed the day and year first herein above written.

SIGNED, SEALED AND DELIVERED BY THE

______________________________

(name and designation)
On behalf of the Governor of Maharashtra
Through competent Authority Shri/Smt.________________Designation

Ist party
In the presence of -
1)
2)
SIGNED AND SEALED BY Shri/Smt.______________Desigtion
IInd Party
In the presence of -
1)
2)

******

**विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१६८(E-१०२७७५६)/ई-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २५ एप्रिल, २०२५.

**संदर्भ :-**

१) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र.ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८,दिनांक ०६/०४/२०११,
२) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र.ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८ दिनांक ३०/०७/२०११,
३) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र.ईएसटी- २०१३/प्र.क्र.१७३/ई-८,दिनांक १४/११/०१३,
४) महसूल व वन विभाग,शासन निर्णय,क्र.ईएसटी-२०१६/प्र.क्र.२३१/ई-८, दिनांक ०८/१२/२०१७
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय,क्र.ईएसटी-२०१६/प्र.क्र.१०७/ई-८,दि.१५/०९/२०१७,

**प्रस्तावना :-**

विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणांत परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करून शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी शासकीय वकीलांना सहाय्य करणे, इत्यादी कामांकरीता राज्यातील ०६ विभागीय आयुक्त व ३५ जिल्हाधिकारी कार्यालयात ( पालघर वगळता) प्रत्येकी एक याप्रमाणे ४१ विधी अधिकारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने संदर्भाधीन क्र. १ व ३ मधील दिनांक ०६ एप्रिल, २०११ व दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेली आहेत. पालघर करीता दि.०८ डिसेंबर,२०१७ मध्ये एका कंत्राटी विधी अधिका-याचे पद निर्माण करण्यात आले. या कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना दरमहा मानधन रू.२०,०००/- व दूरध्वनी व प्रवासखर्च रू.५,०००/- इतकी ठोक रक्कम अदा करण्यात येते.

तद्नंतर महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१०७/ई-८, दिनांक १५ सप्टेंबर,२०१७ अन्वये कंत्राटी विधि अधिकाऱ्यांच्या मानधनात रु. १०,०००/- इतकी वाढ करण्यात येऊन त्यांना सध्या रु. ३५,०००/- इतकी ठोक रक्कम अदा करण्यात येते. या मानधनाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :-

राज्यातील ०६ विभागीय आयुक्त व ३६ जिल्हाधिकारी कार्यालये येथे कार्यरत असणाऱ्या प्रत्येकी एक याप्रमाणे ४२ कंत्राटी विधी अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या दरमहा मानधन रु. ३५,०००/- मध्ये वाढ करुन दरमहा मानधन रू.४५,०००/- आणि दूरध्वनी व प्रवास खर्च रू.५,०००/- अशी एकुण रू.५०,०००/- ठोक रक्कम शासन निर्णयाच्या दिनांकापासून अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयातील कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधन, दूरध्वनी व प्रवास खर्चापोटी ठोक रकमेचा खर्च "मागणी क्र.सी-१- २०५३ जिल्हा प्रशासन (००) १०१ आयुक्त" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधन, दूरध्वनी व प्रवास खर्चापोटी ठोक रकमेचा खर्च "मागणी क्र.सी-१- २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ (०१) सर्वसाधारण आस्थापना" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र.४१/व्यय-९,दिनांक २७/०१/२०२५, अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक २२ एप्रिल,२०२५ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०२५०४२५१४४२०३२२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a3563490854b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949F87062DC806C2B2098F8A369F6E0685E02041722C90F0526791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2025.04.25 14:43:05 +05'30'

**( सत्यनारायण बजाज )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री ( नगर विकास,गृह निर्माण,सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पान शुल्क ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

**Form-I**

(Proforma of the Application for the Appointment of Law Officer)

[See Rule 13(2)]

| |
|---|
| Photograph |

1. Post Applied For :-
2. Full Name of the Applicant (Starting with Surname) :-
   Father's/ Husband's Name :-
3. Residential Address :-

| Permanent Address | Temporary Address |
|---|---|
| Room/Flat/Bldg No. - | Room/Flat/Bldg No. - |
| Village/Post - | Village/Post - |
| Taluka - | Taluka - |
| Road - | Road - |
| District/City - | District/City - |
| State - | State - |
| Pin - | Pin - |

4. (a) Date of Birth :-
   (b) Age on the date of Application :-
5. Place of Birth :-
6. (a) Whether Candidate is Domiciled in State of Maharashtra :-
   (b) Whether enrolled as Member of the Bar Council of Maharashtra and Goa (Specify the Registration No. & Date) :-

7. Educational Qualilfication :-
(Details from SSC & HSC)

| Name of the Examination | Name of University / Board / Institution | Subjects | Class | Year of Passing |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(a) Total number of years of practice

| Name of the Courts where practiced | Total No. of Civil Matters conducted | Total No. of Criminal Matters conducted | Total No. of Service Matters conducted |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

8. Previous employment if any

| Post Hold | Date of Joining | Date of Leaving | Reasons for |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

9. Languages known:-

(Read: ......................................................................)

(Write: ......................................................................)

(Speak: ......................................................................)

10. Whether the Applicant is involved in any criminal offence (Specify the details of offence) :

If so, whether convicted/acquitted :

DECLARATION

I ................................................................... do hereby state that whatever is stated hereinabove is true and correct to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Law Officer, if made, shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action

Date:-

Place:- Signature of Applicant

**N.B.**

1. Candidate shall append the required true copies of testimonials, certificates and documents, duly attested by the Gazetted Officer

2. Canvassing in any form shall disqualify the Applicant.

3. The Applicant shall produce the Character Certificate from any two Senior Advocates/Senior Counsels

4. The Applicant shall affix his/her recent passport size photograph with his signature.